# प्रेस नोट

## “ ३ अग्निशस्त्र व 11 जिवंत काडतुसे हस्तगत

मुंबई पोलीस दलाच्या उत्तर परिमंडळ-3 अंतर्गत अवैध अग्निशस्त्रे बाळगणाऱ्या व्यक्तींविरुद्ध करण्यात आलेल्या तीन स्वतंत्र कारवायांमध्ये दहिसर, वनराई व कुरार पोलीस ठाण्यांनी 3 आरोपींकडून 3 पिस्तुले व 11 जिवंत काडतुसे हस्तगत करून संबंधितांविरुद्ध शस्त्र अधिनियम व महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील लागू तरतुदींनुसार कारवाई केली आहे.

कुरार पोलीस ठाणे येथे दिनांक 18/09/2026 रोजी मातंग गड विकास मंडळ, मालाड टेकडी, मालाड (पूर्व) येथे वाजीद अली इसरार मलिक, वय 26 वर्षे याच्या कब्जातून 1 गावठी पिस्तूल व 2 जिवंत काडतुसे, एकूण किंमत रु.36,000/- हस्तगत करण्यात आली. याप्रकरणी गु.र.क्र. 990/2026, कलम 3, 25 शस्त्र अधिनियम सह कलम 37(1)(अ), 135 महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

तसेच दहिसर व वनराई पोलीस ठाणे येथे देखील अवैध अग्निशस्त्रांविरुद्ध केलेल्या स्वतंत्र कारवायांमध्ये संदीप रमाशंकर उपाध्याय व रोहित अविनाश सावंत यांच्या कब्जातून एकूण 2 पिस्तुले व 9 जिवंत काडतुसे, अंदाजे किंमत रु.1,03,000/- हस्तगत करण्यात आली. याप्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यांत शस्त्र अधिनियम कलम 3, 25 सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम 37(1)(अ), 135 अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहेत.

या तीन कारवायांमध्ये 3 पिस्तुले व 11 जिवंत काडतुसे हस्तगत करण्यात आली आहेत. सदर अग्निशस्त्रे आरोपींनी कोठून व कोणामार्फत प्राप्त केली, ती बाळगण्यामागील उद्देश तसेच त्यांचा अन्य गुन्ह्यांमध्ये वापर झाला आहे किंवा कसे, याबाबत संबंधित पोलीस ठाण्यांकडून सखोल तपास करण्यात येत आहे. अवैध अग्निशस्त्रांची खरेदी-विक्री, पुरवठा, वाहतूक व विनापरवाना कब्जा याविरुद्ध उत्तर परिमंडळ-3 अंतर्गत यापुढेही प्रभावी कारवाई सुरू राहणार आहे.

सदर कारवाईमध्ये कुरार पोलीस ठाणेचे पो.उ.नि. रफिक मुजावर, पो.ह. शकील शेख, पो.शि. कांबळे व पो.शि. तुषार बारसिंग,  दहिसर पोलीस ठाणेचे सपोनि इंद्रजीत पाटील, सहा. फौ. ऑस्कर कोलासो, सहा. फौ. राजू नार्वेकर, पो.ह. बसवराज चुंगीवडयार, पो.शि. विलास आव्हाड व पो.शि. निलेश शनवार, वनराई पोलीस ठाणेचे पो.उ.नि. प्रदीप शिंदे, पो.ह. योगेश साळुंखे, पो.ह. संतोष तेली व पो.शि. निलेश शिंदे यांनी सहभाग घेऊन महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली.

.................................................

# अटक आरोपी

| पोलीस ठाणे | गु.र.क्र | अटक आरोपीचे नाव व पत्ता | फोटो |
|---|---|---|---|
| कुरार | गु.र.क्र. 990/2026, कलम 3, 25 शस्त्र अधिनियम सह कलम 37(1)(अ), 135 महाराष्ट्र पोलीस अधिनियम | वाजीदअली इसरार मलिक, वय 26 वर्षे, रा. ठी. रूम नं. 11, तारी कंपाऊंड, एस. व्ही. रोड, दहिसर पूर्व, मुंबई |  |
| दहिसर | गु.र.क्र 1241/2022, कलम u/s 3,25 भारतीय हत्यार कायदा सह कलम 37 (१) (अ), सह १३५ म.पो.का | संदीप रमाशंकर उपाध्याय, वय 34 वर्षे, धंदा फॅब्रिकेशन, पत्ता - रूम 03, न्यू गणेश वाडी वेल्फेअर सोसायटी क्र 02, लक्ष्मण नगर, ए व्ही एम शाळेच्या पाठीमागे, कुरार व्हिलेज, मालाड पूर्व मुंबई |  |
| वनराई | गु.र.क्र. 675/2026, कलम 3, 25 शस्त्र अधिनियम सह कलम 37(1)(अ), 135 महाराष्ट्र पोलीस अधिनियम | रोहित अविनाश सावंत वय 36 वर्ष राहणार रूम 3 व्यस्ता मंगल चाळ, साईबाबा मंदिर जवळ, मालपा डोंगरी नंबर 1 चकाला अंधेरी पूर्व, मुंबई |  |